## एकविसाव्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या अधिमंडळाची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २४/०९/२०२२ रोजी दुपारी ३.०० वा. संस्थेचे अध्यक्ष श्री. जनार्दन बजरंग झोरे यांचे अध्यक्षतेखाली एस. एल. ॲन्ड एस. एस. मुलींची शाळा, २४ नवरोजी स्ट्रीट, जगन्नाथ शंकरशेठ रोड, ठाकूरद्वार, मुंबई – ४०० ००२ या ठिकाणी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

## सभेपुढील विषय

१. दि. ३०/०९/२०२१ रोजी झालेल्या २० व्या अधिमंडळाच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळाने सादर केलेला दि. ३१/०३/२०२२ अखेरचा वार्षिक अहवाल, नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे.

३. सन २०२१–२२ या अहवालसालातील संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणी व लाभांशास मंजूरी देणे.

४. सन २०२२–२३ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे व गतवर्षात अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

५. सन २०२१–२२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

६. सन २०२२–२३ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे.

७. संचालक मंडळाने कर्ज फेडीसाठी असक्षम ठरविलेल्या सभासदांच्या कर्जावरील व्याजामध्ये अंशत: सुट दिलेल्या रक्कमेस मंजूरी देणे.

८. सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरूस्ती अहवाल व त्यावरील निर्देशांची नोंद घेऊन कार्यवाही करणे.

९. सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१०. संस्थेच्या उपविधीतील पोटनियमामध्ये संचालक मंडळाने सुचविलेल्या दुरूस्तीस मंजूरी देणे.

११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
सचिव
**श्री. भागुजी धोंडीबा झोरे**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०७/०९/२०२२

## विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी तहकूब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

२) सभासदांना काही प्रश्न विचारायचे असल्यास त्यांनी दिनांक १९ सप्टेंबर २०२२ पुर्वी पत्राद्वारे मुख्य कार्यालयात किंवा jaimalharpatsanstha@yahoo.com या ई–मेल वर पाठविण्यात यावेत.